# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

---

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/अंतरिम कंस क्र.५०,५१/२०१४-१५/१५१ दिनांक : २२.०८.२०१४

**आदेश केस क्र.५०,५१/१४-१५**

प्रति,
१.सौ.अश्विनी प्रसाद भिडे,
लोअर ग्राऊंड फ्लोअर, नामदेव नेस्ट, **(केस क्र.५०/१४-१५)**
११६०/ब, राजाराम रोड, कोल्हापूर.

२.श्री.सुहास सुधाकर पवार,
११६०/ब, नामदेव नेस्ट अपार्टमेंट, **(केस क्र.५१/१४-१५)**
अप्पर ग्राऊंड फ्लोअर, कोल्हापूर.

अर्जदार

**विरुध्द**

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, कोल्हापूर.

२) कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, शहर कोल्हापूर.

३) अतिरिक्त कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उपविभागीय कार्यालय, पूर्व, कोल्हापूर.

विरुध्द पक्षकार

# <u>अंतरिम आदेश</u>

तक्रारदार ग्राहक (केस क्र.५०) यांनी आपले प्रतिनिधी श्री.प्रसाद भिडे यांचेमार्फत व श्री.सुहास सुधाकर पवार (केस क्र.५१) यांनी मंचाकडे वितरण कंपनीचे पूर्व उपविभाग, कोल्हापूर, यांचेविरुध्द अंतरीम आदेश मिळण्यासाठी तक्रार दाखल केली. या दोन्ही ग्राहकांनी अंतर्गत कक्ष, कोल्हापूर, येथे क्ष फॉर्ममध्ये दि.१९.०८.२०१४ रोजी तक्रार दाखल केली. सहाय्यक अभियंता, यांनी दि.०८.०८.२०१४ रोजी दिलेल्या नोटीशीसंदर्भात मनाई मागणी केली आहे. यामधील आक्षेपानुसार वितरण कंपनीच्या मंजुरीशिवाय परस्पर दोन्ही मीटरचा वापर एकत्रितपणे एकाच कारणांसाठी करीत आहात ही बाब वीज कायदा २००३ कलम १२६ चा भंग करणारी आहे. त्या नोटीशीमध्ये मीटर काढण्याची कारवाई करणेत येईल व दोन्ही मीटरचा वापर गृहित धरुन वीज दराची आकारणी गतकालावधीपासून करणेत येईल. फरकाचे बील भरणे बंधनकारक राहील.

आज रोजी मंचासमोर ग्राहक प्रतिनिधी श्री.भिडे,श्री.सुहास पवार, श्री.हजारे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता, श्री.सागर दांगट, सहाय्यक अभियंता, उपस्थित होते. ग्राहकास सदर नोटीशीनुसार वीजपुरवठा खंडित होण्याची भिती आहे.

सुनावणीदरम्यान अंतर्गत कक्षात सुनावणी होईपर्यंत किंवा मंचाचे पुढील आदेश होईपर्यंत वीजपुरवठा खंडित करण्याची कुठलीही कारवाई करण्यात येणार नाही असे ठरले. अंतर्गत कक्षात कंपनीने लेखी म्हणणे देऊन आपली बाजु मंचासमोर व ग्राहकाने आपली मागणी प्रथम तेथे मांडावी असे सुचित करण्यात आले.

## आदेश

वितरण कंपनीने ग्राहकाचे कनेक्शन क्र.२६६५१३०५७१५६/२ (केस क्र.५०) व कनेक्शन क्र.२६६५१३०५७१४८/२ (केस क्र.५१) मंचाचे पुढील आदेश होईपर्यंत दि.०८.०८.२०१४ च्या नोटीशीच्या अनुषंगाने खंडित करु नये. उभय बाजुने अंतर्गत कक्ष, कोल्हापूर, येथे आपले कायदेशीर म्हणणे मांडून क्ष मधील तक्रारीच्या सुनावणीस हजर रहावे.

| | | |
|---|---|---|
| सही/- | सही/- | सही/- |
| (जी.बी.पानकर) | (जी.सी.लेले) | (बी.जी.पवार) |
| सदस्य सचिव | ग्राहक सदस्य | अध्यक्ष |